**प्रेस नोट** दि.१/४/२०२२

फॉरेस्ट नाका येउर ठाणे येथील नाकेदार यांना लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | वर्तक नगर पोलीस स्टेशन |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | १) अनंत ऐतवार घरत वय ५६ वर्षे पद– नाकेदार संजय गांधी राष्ट्रीय उदयान वनपरीक्षेत्र येऊर ठाणे.<br>२) बाळकृष्ण जयराम सावंत वय ५९ वर्षे पद– वनमजूर संजयगांधी राष्ट्रीय उदयान वनपरीक्षेत्र येऊर ठाणे. दोन्ही वर्ग–४ |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ३०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | २५००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील तक्रारदार हे कुरीअर कंपनीत काम करीत असून त्यांचे कंपनीचे ग्रुपने कोळी फार्म येऊर येथे दि.१.४.२०२२ रोजी दुपारी पार्टीचे आयोजन केले होते. परंतू येउर येथे वर जाण्याकरीता येउर येथील प्रवेशद्वारावर वन विभागाचे कर्मचारी हे गाडया थांबवून त्यांची १४ वाहने व ३० इसमांना वरती सोडण्याकरीता ३०००/–रु. लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात दि.०१/४/२०२२ रोजी लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.१.४.२०२२ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक क्र १) अनंत ऐतवार घरत नाकेदार व लोकसेवक क्र.२ बाळकृष्ण जयराम सावंत वनमजूर नेम. वनपरीक्षेत्र येउर संजय गांधी राष्ट्रीय उदयान ठाणे वर्ग–४ यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची १४ वाहने व ३० इसमांना वरती सोडण्याकरीता तडजोडीअंती २५००/–रु. लाचेची मागणी केल्याचे व लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाल्याने असीबी ठाणे युनिटने आज दि.१.४.२०२२ रोजी येउन प्रवेशद्वार येथे सापळयाचे आयोजन केले असता लोकसेवक क्र.२ बाळकृष्ण सावंत यांनी तक्रारदार यांचेकडून २५००/–रु.लाचेची रक्कम स्विकारली व आलोसे क्र.१ व २ यांना लागलीच ताब्यात घेण्यात आले. असून लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–**acbmaharashtra@mahapolice.gov.in**
३) ई–मेल आयडी :–**spacbthane@mahapolice.gov.in**
४) अॅप्लीकेशन :–**acbmaharashtra.net**
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो

(सुरेश गणपत चोपडे)
पोलीस निरीक्षक
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे